# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१६/०५/२०२५

### जिल्हा : सोलापूर

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१६/०५/२०२५ ते २०/०५/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| पाऊस (ममी) | 9 | 16 | 11 | 16 | 20 |
| कमाल तापमान (अं.से.) | 38 | 37 | 36 | 37 | 35 |
| कमान तापमान (अं.से.) | 23 | 22 | 24 | 25 | 23 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 7 | 8 | 8 | 8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 94 | 93 | 95 | 96 | 97 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 56 | 57 | 63 | 60 | 61 |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | 6 | 10 | 10 | 12 | 11 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 277 | 308 | 302 | 329 | 304 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६ व १७ मे, २०२५ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक १८, १९ व २० मे, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १६, १७ व १९ मे, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा ( ४० ते ५० क.मी./तास), मेघगर्जना, वजासह पावसाची शक्यता असून दिनांक १८ व २० मे, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (५० ते ६० क.मी./तास), मेघगर्जना, वजासह पावसाची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक २१ ते २७ मे, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • तुरळक ठिकाणी वादळी वारा , मेघगर्जना, वजासह पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची, पकाची व पशुधनाची काळजी घ्यावी.<br>• अवेळी पावसाची शक्यता असल्याने फळ बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी, तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे. |

| | | |
|---|---|---|
| | | • मातीतील ओलावा टिक वण्यासाठी व बाष्पीभवन रोकण्यासाठी अच्छादन (मल्चिंग) करणे फायदेशीर ठरेल. नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास, व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी , हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व वजेच्या पूर्वानुमानाकरिता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| अवकाळी पाऊसा पूर्वी व नंतरच्या उपाययोजना | | अवेळी पावसाची शक्यता असल्याने शेतातील सर्व पकक्षेत्रातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करावी. अवकाळी पावसानंतर हवेत थंडावा निर्माण होतो, थंडीपासून फळबागांचे संरक्षणासाठी त्याच दिवशी बागेस वहिरीचे पाणी देवून हलके ओलीत करावे. अवकाळी पावसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी व खत करण्यासाठी वापरावे. अवकाळी पावसानंतर शेतातील उभ्या पकाची पड झाली असल्यास पक बांधणी करावी. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) प्रती हेक्टरी ५ वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. ऊस पकासाठी ठिबक संचन पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. पाचट आच्छादनाचा वापर करून उपलब्धता व आवश्यकतेनुसार सरी आड सरीतून पाणी द्यावे. |
| कांदा | काढणी ते साठवणूक अवस्था | अवेळी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. तसेच उघड्यावरील शेतमाल ताडपत्रीने झाकून ठेवावे. |
| उन्हाळी भुईमूग | काढणी ते साठवणूक अवस्था | अवेळी पावसाची शक्यता असल्याने पक्व पकाची काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. |
| उन्हाळी बाजरी | काढणी ते साठवणूक अवस्था | अवेळी पावसाची शक्यता असल्याने पक्व पकाची काढणी करावी व काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. तसेच उघड्यावरील शेतमाल ताडपत्रीने झाकून ठेवावे. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप बघून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | अवेळी पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या कंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाटट्यांच्या सहाय्यने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक पाण्याचा निचरा करावा. |
| द्राक्ष | पीक वाढीची अवस्था | अवेळी पावसाची शक्यता असल्याने खरड छाटणी झालेल्या बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी व अतिरिक पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | पक्वता ते | ज्या बागेतील फळ काढणी पूर्ण झाली असेल त्या बागेत हलकी छाटणी करून घ्यावी. तसेच कॉपर |

| | | |
|---|---|---|
| | काढणी अवस्था | ऑक्झीक्लोराईड २० ग्रॅम प्रती १० लटर पाणी या प्रमाणात पाऊस नसताना फवारणी करावी. तयार झालेली आंब्याची फळे काढून सुर क्षत ठिकाणी पकण्यासाठी ठेवावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲप च्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :-
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : १६.०५.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**